आकाशवाणी पुणे

पुणे वृत्तांत

वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

दिनांक – २३/०३/२०२४ वार – शनिवार

सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून दिव्यांगांसाठी लायन्स क्लबकडून सुरू असलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार राज्यसभा खासदार डॉक्टर मेधा कुलकर्णी यांनी आज काढले. लायन्स क्लब इंटरनॅशनलच्या वतीनं २६ दिव्यांगांना व्हीलचेअरचं वाटप करताना त्या बोलत होत्या. दिव्यांगांसाठी एकाच छताखाली सर्व गोष्टी उपलब्ध करून देण्यासाठी लायन्स क्लबनं पुढाकार घ्यावा, असं आवाहन त्यांनी केलं. यावेळी लायन्स क्लबचे सभासद, दिव्यांग विद्यार्थी मोठ्या संख्येनं उपस्थित होते. दिव्यांगांसाठी लायन्स क्लबच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवत असताना अनेकांचे सहकार्य मिळत आहे, हे कार्य समाधान देणारं आहे अशी कृतज्ञ भावना माजी प्रांतपाल रमेश शहा यांनी व्यक्त केली.

सामान्यतः होळी पौर्णिमेनंतर उन्हाच्या झळा जाणवू लागतात. यंदा गेल्या किमान १५ ते २० दिवसांपासूनच हवामानातील उष्मा वाढला असून आगामी काही दिवसांत पुण्यासह राज्यातील काही भागात तापमानाचा पारा ३९ ते ४० अंशापर्यंत पोचेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. नागरिकांनी घराबाहेर पडताना उन्हापासून बचावाची साधनं वापरावीत, शक्यतो ताज्या अन्नाचं सेवन करावं असं आवाहन तज्ञांनी केलं आहे.

होळीसाठी कोणत्याही वृक्षांची तोड करू नये. कोणतीही व्यक्ती विनापरवाना वृक्ष तोडीत असल्यास किंवा विस्तार कमी करीत असल्यास पुणे महापालिकेच्या संबंधित क्षेत्रिय कार्यालयाकडे तक्रार करावी, असं आवाहन पुणे महापालिकेच्या उद्यान विभागाचे प्रमुख अशोक घोरपडे यांनी केलं आहे. टोल फ्री क्रमांक १८०० १०३ ०२ २२ किंवा व्हॉटस ॲप क्रमांक ९६ ८६ ९० ०० ०२ यावर देखील नागरिक तक्रार करू शकतात.

धुलीवंदन आणि रंगपंचमीला विविध संघटनांकडून खडकवासला जलाशय रक्षण अभियान या वर्षीही राबवण्यात येणार आहे. धुलीवंदन २५ मार्च आणि रंगपंचमी ३० मार्च या दोन्ही दिवशी प्रबोधनात्मक फलक हातात धरून सकाळी नऊपासून सायंकाळी सात वाजेपर्यंत

खडकवासला धरणाभोवती मानवी साखळी करून जलाशयाचं रक्षण करण्यासाठी प्रबोधन करण्यात येणार आहे.

‘मिशन आर्थ्रायटिस इंडिया’तर्फे राष्ट्रीय संधिवात रुग्ण परिषद पुण्यात आयोजित करण्यात आली होती. हवामान आणि ऋतू बदल, प्रदूषण, आहार आणि पारंपरिक उपचार पद्धतीचा संधिवातावर होणारा परिणाम आणि नियोजन ही या परिषदेची संकल्पना होती.

पुणे शहरातील शीतपेयांची विक्री करणाऱ्या व्यावसायिकांवर आता अन्न आणि औषध प्रशासन विभागाची करडी नजर राहणार असून आगामी काळात या व्यवसायिकांच्या दुकानांची अचानक तपासणी देखील केली जाणार आहे. या दुकानांमधून वापरल्या जाणाऱ्या बर्फाची त्याचबरोबर अन्य कच्च्या मालाची गुणवत्ता स्वतंत्र मोहिमेत तपासली जाणार आहे. केवळ उन्हाळ्याच्या हंगामातच चालणाऱ्या या व्यवसायातून कमी वेळात जास्तीत जास्त नफा कमावण्याच्या हेतूनं दुय्यम दर्जाच्या मालाचा वापर केला जात असून त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याला बसतो. हे लक्षात घेऊन ही तपासणी मोहीम राबवली जाणार आहे.

कोथरूड इथलं एकलव्य कॉलेज ते पुणे-बंगळुरू महामार्गापर्यंतचा अर्धवट रस्ता मिसिंग लिंकअंतर्गत लवकरच सुरू होणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या पथ विभागाचे प्रमुख अनिरुध्द पावसकर यांनी दिली. त्यामुळे पौड रस्ता तसंच महात्मा सोसायटीला वळसा घालून जवळपास दोन किलोमीटर अंतर, तसंच २५ ते ३० मिनिटे करावा लागणारा प्रवास आता अवघ्या पाच मिनिटांत होणार आहे.

जगद्गुरू संत तुकाराम महाराज बीज सोहळ्यानिमित्त येत्या बुधवारी देहू इथल्या मंदिर आणि मंदिर परिसरात होणारी गर्दी विचारात घेऊन विविध प्रकारच्या विक्रेत्यांना बसण्यास आणि फिरण्यास प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. या विक्रेत्यांमुळे मोठ्या प्रमाणात गर्दी होऊन चेंगराचेंगरी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळं पिंपरी चिंचवड पोलीस प्रशासनानं हा आदेश काढला आहे.

शहीद दिनानिमित्त थोर क्रांतिकारक शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेला तसंच दापोडी इथल्या शहीद भगतसिंग यांच्या पुतळ्याला पिंपरी-चिंचवड मनपाचे अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. या कार्यक्रमाला महानगरपालिकेचे अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते.

धूलीवंदनानिमित्त परवा सोमवारी पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती बंद असून शेतकऱ्यांनी आपला शेतीमाल विक्रीसाठी बाजार समितीच्या आवारात आणू नये, असं आवाहन समिती प्रशासनाच्या वतीनं करण्यात आलं आहे. मोशी बाजारही बंद देवण्यात येणार आहे.

चौदाव्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत आज तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या लढतीत झारखंडनं मध्यप्रदेशचा 2-0 असा पराभव केला. गत विजेता मध्य प्रदेश संघाला चौथ्या स्थानावर समाधान मानावं लागलं.आज रात्रीच्या सत्रात यजमान महाराष्ट्र आणि हरियाणा संघात विजेतेपदासाठी लढत होणार आहे.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.